दैनिक,
# मुक्ताई दूत
सत्य व निर्भीड बातम्यांचं दालन
RNI-MHMAR/26/A1057
epaper.muktaidoot.com | महाराष्ट्र | जळगाव | रविवार, दि. २५ ऑक्टोंबर २०२६ | वर्ष १ | अंक १४९ | पाने -४

### आपलं अध्यात्म

बाळक चुकलें सुकुमार तान्हुलें ।
त्यानें पै सांडिलें मायाजाळ ॥१॥
जो जो जो जो पुत्रातें निजवी ।
अनुहात बोवी नि:शब्दाची ॥२॥
मावळली दिशा वाचा पे खुंटली
माया मै भेटली मुक्ताबाई ॥३॥
मुक्ताई म्हणे नांव पे ठेवीन
सुता बोलाविन वटेश्वरा ॥४॥

## ट्रम्प यांचा पुन्हा दावा; २५० टक्के टॅरिफच्या धमकीने भारत-पाक संघर्ष थांबवला

वॉशिंग्टन : एप्रिल २०२५ मध्ये पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त दावा केला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात निर्माण झालेला संघर्ष थांबवण्यासाठी आपण दोन्ही देशांना २५० टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लावण्याची धमकी दिली होती आणि त्यानंतरच दोन्ही देशांनी गोळीबार थांबवला, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, ट्रम्प यांनी एका कार्यक्रमादरम्यान भारत-पाकिस्तान संघर्षाचा उल्लेख करताना दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज असल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली होती, असे सांगितले. युद्ध आणखी तीव्र झाल्यास त्याचे जागतिक परिणाम होऊ शकले असते, असा दावाही त्यांनी केला. अशा पार्श्वभूमीवर



दोन्ही देशांच्या नेतृत्वाशी संवाद साधत आपण कठोर भूमिका घेतल्याचे ट्रम्प यांनी स्पष्ट केले.

“मी त्यांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, जर संघर्ष सुरूच ठेवला, तर अमेरिकेसोबत व्यापार करता येणार नाही. आम्ही दोन्ही देशांवर २५० टक्के इतके प्रचंड आयात शुल्क लावू. त्यानंतर कोणताही व्यापार शक्य होणार नाही,” असे ट्रम्प म्हणाले. त्यांच्या मते, या इशाऱ्यामुळे दोन्ही देशांतील नेते संतप्त झाले होते. मात्र, शेवटी त्यांनी संघर्ष थांबवण्याचा निर्णय घेतला.

ट्रम्प यांनी या संघर्षादरम्यान ११ विमाने पाडण्यात आल्याचाही दावा केला. मात्र, ही विमाने कोणत्या देशाची होती किंवा त्यासंदर्भातील अधिकृत माहिती काय आहे, याबाबत त्यांनी कोणताही तपशील दिला नाही. तसेच या दाव्याची स्वतंत्र पुष्टीदेखील उपलब्ध नाही.

“मी अनेक युद्धे थांबवली आहेत. दोन अण्वस्त्रसज्ज राष्ट्रांमधील संघर्ष रोखणे ही मोठी गोष्ट आहे. याचे श्रेय मिळणे माझ्यासाठी सन्मानाची बाब आहे,” असेही ट्रम्प यांनी यावेळी नमूद केले.

दरम्यान, भारत आणि पाकिस्तानमधील संघर्ष थांबवण्यात आपण महत्त्वाची भूमिका बजावल्याचा दावा ट्रम्प यांच्याकडून यापूर्वीही अनेकदा करण्यात आला आहे. मात्र, भारत सरकारने अशा तृतीय पक्षाच्या मध्यस्थीचे दावे सातत्याने फेटाळले आहेत. भारताची अधिकृत भूमिका अशी आहे की, संघर्षविरामासंदर्भातील चर्चा आणि निर्णय हे भारत व पाकिस्तानच्या लष्करी यंत्रणांदरम्यान थेट संवादातून झाले होते. त्यामुळे ट्रम्प यांच्या वक्तव्यांमुळे पुन्हा एकदा या विषयावर राजनैतिक चर्चांना उधाण आले आहे.

## निवडणूक आयोगाचा घोळ : मतदारयादीतील घोळावर रोहित पवारांचा हल्लाबोल

मुंबई : उत्तर प्रदेशातील मतदारयादीतील धक्कादायक चुका समोर आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनी निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली आहे. मतदारांच्या नावांमध्ये आणि वडिलांच्या नावांमध्ये आक्षेपार्ह व हास्यास्पद नोंदी आढळल्याने निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

रोहित पवार यांनी सोशल मीडियावरील ‘एक्स’ या माध्यमातून निवडणूक आयोगाच्या कारभारावर निशाणा साधला. त्यांनी काही उदाहरणे देत



मतदारयादीतील गंभीर त्रुटी अधोरेखित केल्या. एका मतदाराचे नाव ‘राम ने यादव को मारा’ असे नोंदविण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. तर काही मतदारांच्या वडिलांच्या नावांमध्ये ‘मूर्ख’, ‘बीकॉम’ तसेच ‘मोहम्मद इक्बाल भीक मांगते है’ अशा नोंदी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रकारावर संताप व्यक्त करताना पवार म्हणाले की, हा निवडणूक आयोगाचा गलथान कारभार असून यामुळे मतदारयादीच्या अचूकतेबाबत गंभीर शंका निर्माण होत आहेत. तसेच अलीकडेच पत्रकार परिषदेत मांडलेल्या निवडणूक आयोगातील त्रुटी आणि विशेष संक्षिप्त पुनरावलोकन (SIR) प्रक्रियेतील घोळांवर उत्तर प्रदेशातील घटनांनी शिक्कामोर्तब केल्याचा दावाही त्यांनी केला.

दरम्यान, उत्तर प्रदेशातील अधिकाऱ्यांनी या प्रकरणावर स्पष्टीकरण दिले आहे. विधान परिषद पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी प्रथमच ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आल्याने सॉफ्टवेअरमधील तांत्रिक त्रुटींमुळे या चुका झाल्याचे सांगण्यात आले आहे. राज्यातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनीही याची दखल घेतली आहे.

उत्तर प्रदेशात आगामी विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू असताना मतदारयादीतील या त्रुटींमुळे राजकीय वातावरण तापले आहे. आता रोहित पवार यांच्या आरोपांना आणि निवडणूक आयोगावरील टीकेला भारतीय जनता पक्षाकडून काय उत्तर दिले जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## एल निनो संकट : दुष्काळाच्या संकटामुळे विभागनिहाय २० टक्के निधीकपात

मुंबई : राज्यात एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती गंभीर बनत चालली असून त्याचा थेट परिणाम राज्याच्या अर्थकारणावर होत आहे. जलसंधारण, पाणीपुरवठा, चारा आणि दुष्काळ निवारणासाठी मोठ्या प्रमाणात अतिरिक्त निधी खर्च करावा लागणार असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व सरकारी विभागांना खर्चात किमान २० टक्के कपात करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्याचबरोबर आर्थिक मंदीची झळही राज्याला बसत असल्याने महसुलात घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



राज्याच्या महसुली खर्चातील ५० टक्क्यांहून अधिक रक्कम वेतन, निवृत्तिवेतन आणि कर्जावरील व्याजफेडीसाठी खर्च होत असल्याने तिजोरीवर मोठा ताण निर्माण झाला आहे.

‘लाडकी बहीण’ योजनेसह विविध कल्याणकारी योजनांचा खर्च, शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली कर्जमाफी आणि दुष्काळ निवारणासाठी लागणाऱ्या निधीमुळे आगामी महिन्यांत शासनाला मोठ्या प्रमाणात कर्ज उभारावे लागण्याची शक्यता आहे. दिवाळीनिमित्त एक कोटीहून अधिक शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये अग्रिम देण्याच्या निर्णयामुळेही सुमारे पाच हजार कोटींचा अतिरिक्त भार पडणार आहे.

या पार्श्वभूमीवर वित्त विभागाने सर्व खात्यांना काटकसरीचा अवलंब करण्याचे निर्देश दिले आहेत. अनावश्यक खर्च टाळणे, नव्या विकासकामांना मर्यादित मंजुरी देणे तसेच रस्ते व सिंचन प्रकल्पांवरील खर्चात कपात करण्याचा सल्ला मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला आहे. मात्र शिष्यवृत्ती, शालेय पोषण आहार, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील खर्चात मोठी कपात करू नये, अशा सूचनाही शासनाने दिल्या आहेत.

### Short News

#### तिलकच्या खेळीने भारताचा थरारक विजय



न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात भारताने ४ विकेट्सने रोमांचक विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने १८० धावांचे आव्हान उभे केले. प्रत्युत्तरात भारताची सुरुवात खराब झाली आणि अव्वल पाच फलंदाज स्वस्तात बाद झाले.

अडचणीत सापडलेल्या भारताचा डाव नमन धीरने ३१ धावांची खेळी करत सावरला. मात्र त्याची विकेट गेल्यानंतर सामना पुन्हा न्यूझीलंडच्या बाजूने झुकला. अशावेळी तिलक वर्माने संयमी आणि आक्रमक फलंदाजी करत भारताला विजयाच्या उंबरठ्यावर नेले.

अखेरच्या षटकात भारताला ११ धावांची गरज होती. तिलकने चौकारासह महत्त्वाच्या धावा करत २६ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. शेवटच्या क्षणी नितीश रेड्डीनेही चांगली साथ दिली. तिलकच्या नाबाद अर्धशतकी खेळीच्या जोरावर भारताने लक्ष्य गाठत ४ विकेट्सने संस्मरणीय विजय मिळवला. न्यूझीलंडच्या जबड्यातून विजय हिसकावून आणणारा तिलक वर्मा सामन्याचा खरा नायक ठरला.

#### उत्तर प्रदेश निवडणुकीत जागावाटपाचा पेच

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीपूर्वी समाजवादी पक्ष आणि काँग्रेसमध्ये जागावाटपावरून मतभेद उफाळले आहेत. काँग्रेसने ४०३ पैकी १८० ते २०० जागांची मागणी केली असून समाजवादी पक्ष त्यासाठी तयार नसल्याचे दिसते. सपाची काँग्रेसला ५० ते ८० जागा देण्याची भूमिका असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. काही जागांवर दोन्ही पक्षांमध्ये दावे असल्याने पेच निर्माण झाला आहे. मात्र, भाजपाविरोधातील युती कायम ठेवण्याबाबत राहुल गांधी आणि अखिलेश यादव सकारात्मक असल्याचे सांगितले जात आहे.

## पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रणाला ब्रेक! केंद्राच्या नव्या निर्णयामुळे साखरेचे दर स्वस्त होणार? कारखान्यांचे बिघडणार गणित!

सांगली : पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण वाढविण्यासाठी केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत राबविलेल्या धोरणाला आता मोठा ब्रेक लागला आहे. केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालय आणि तेल कंपन्यांच्या नव्या निविदांमध्ये उसाचा रस, सिरप आणि बी-हेवी मळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलच्या खरेदीवर निर्बंध घालण्यात आले असून केवळ सी-हेवी मळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलची खरेदी करण्यात येणार आहे. त्यामुळे साखर उद्योगाचे गणित बिघडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या निर्णयामुळे इथेनॉल निर्मितीकडे वळवला जाणारा ऊस आणि मळी पुन्हा साखर उत्पादनासाठी वापरावी लागणार आहे. परिणामी बाजारात साखरेचा पुरवठा वाढेल आणि साखरेच्या दरवाढीला आळा बसू शकतो. ग्राहकांसाठी हा निर्णय फायदेशीर ठरण्याची शक्यता असली तरी साखर कारखान्यांच्या महसुलावर त्याचा परिणाम होणार आहे.

महाराष्ट्रात १२३ साखर कारखाने आणि ३२ स्वतंत्र डिस्टिलरी प्रकल्प कार्यरत आहेत. राज्याची वार्षिक इथेनॉल



निर्मिती क्षमता सुमारे ३७५ कोटी लिटर इतकी आहे. नव्या निर्बंधांमुळे या क्षमतेपैकी केवळ ३० ते ३५ टक्के भाग वापरला जाण्याची शक्यता असून उर्वरित क्षमता मर्यादित राहू शकते. या क्षेत्रात सुमारे ३५ ते ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे.

माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड यांच्या मते, सरकार उसाऐवजी मका व इतर धान्यांपासून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देत आहे. साखरेचे दर नियंत्रणात ठेवणे हाही यामागील उद्देश आहे. मात्र त्यामुळे साखर उद्योग ‘रिव्हर्स गियर’मध्ये गेल्याची भावना उद्योग क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

राजारामबापू साखर उद्योगसमूहाचे कार्यकारी संचालक आर. डी. माहुली यांनी केंद्राच्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील साखर उद्योगाला सुमारे सात हजार कोटी रुपयांचा फटका बसू शकतो, असा अंदाज व्यक्त केला आहे. दुष्काळी परिस्थिती, मक्याच्या उत्पादनातील संभाव्य घट आणि इथेनॉल अनुदानातील कपात यामुळे उद्योगासमोरील आव्हाने आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तेल कंपन्यांची इथेनॉलची ११०० कोटी लिटर्सची मागणी कायमच आहे. मका आणि ज्वारीपासूनच्या इथेनॉलची मागणी वाढवून उसापासूनची मागणी कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. वाढत्या विरोधामुळे २० टक्क्यांपेक्षा अधिक इथेनॉल मिश्रण करण्याचा निर्णय थोडा लांबणीवर टाकण्याचेही सरकारचे धोरण आहे. बाजारातील साखरेचे दर नियंत्रण ठेवण्याचाही त्यामागे उद्देश आहे. मात्र यामुळे साखर कारखानदारी ‘रिव्हर्स गियर’मध्ये आली आहे, हे निश्चित.

**-शेखर गायकवाड, माजी साखर आयुक्त**

## Hilight News

### माहिती आहे, पण ज्ञानाचा अभाव



नागपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राचार्यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत विद्यार्थ्यांच्या नव्या पिढीबाबत भाष्य केले. Gen Z आणि Gen Alpha पिढी माहिती व तंत्रज्ञानाच्या विस्फोटाच्या काळात जन्मली असून त्यांच्याकडे भरपूर माहिती आहे, मात्र ज्ञानाचा अभाव असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांकडे असलेली माहिती ज्ञानात रूपांतरित करण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांवर असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी भाषणादरम्यान हलक्याफुलक्या शैलीत आयोजकांनी केलेल्या आपल्या परिचयाचाही उल्लेख केला.

### मुंबईच्या महिला टी-२० संघात नालासोपाऱ्याच्या सेजल राऊतची निवड



वसई: भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) वरिष्ठ महिला टी-२० ट्रॉफी स्पर्धेसाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनने (एमसीए) मुंबईचा १६ सदस्यीय महिला संघ जाहीर केला आहे. या संघात नालासोपाऱ्याची सेजल राऊत हिची निवड करण्यात आली आहे. महिला टी-२० ट्रॉफी स्पर्धा पुणे येथे २६ ऑक्टोबर पासून खेळविण्यात येणार आहे.

या स्पर्धेत मुंबईचे तीन सामने खेळवले जाणार आहेत. या स्पर्धेसाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या वरिष्ठ महिला निवड समितीने या संघाची निवड केली आहे. समितीचे अध्यक्ष मनीष मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कल्पना कार्डोसो, अपर्णा चव्हाण, सीमा पुजारे आणि आशिष महादेश्वर यांनी खेळाडूंची करण्यात केली आहे.

### नीट पेपरफुटी प्रकरणात धक्कादायक खुलासे



नीट पेपरफुटी प्रकरणाच्या सीबीआय तपासात लातूरच्या आरसीसी क्लासेसचे संस्थापक शिवराज मोटेगावकर यांच्या मोबाईलमध्ये केमिस्ट्री विषयाचे सर्व ४५ प्रश्न आढळल्याचा दावा पुरवणी आरोपपत्रात करण्यात आला आहे. तपासानुसार प्रश्नपत्रिकेची माहिती परीक्षा पूर्वीच व्हॉट्सअॅप, टेलिग्राम आणि एअरड्रॉपद्वारे प्रसारित करण्यात आली. मॉक टेस्टमध्येही मूळ प्रश्नांचा समावेश असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात १३ जणांना आरोपी करण्यात आले असून सीबीआयकडून पुढील तपास सुरू आहे.

# संघर्षाचे राजकारण, निस्पृहतेचा मुखवटा आणि बदलता राजकीय पट

**संपादकीय**
**संतोष मराठे**

महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर गेल्या काही काळात झालेला स्थित्यंतर घडवणारा प्रवास म्हणजे मराठा आरक्षण आंदोलन आणि त्याभोवती गुंफले गेलेले राजकारण! हिंगोलीतील डिग्रस कराळे गावातील मारुती मंदिरासमोर तरुणांनी घेतलेली ती एक शपथ केवळ एका गावापुरती मर्यादित नव्हती, तर ती महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील असंतोषाची आणि राजकीय उद्रेकाची नांदी ठरली.

लोकप्रतिनिधींना गावोगावी रोखणे, कार्यक्रमांमधून पळवून लावणे आणि थेट सत्तेला जाब विचारणे, यातून राज्यातील सर्वपक्षीय नेत्यांचे धाबे दणाणले होते. ज्या आंदोलनाची सुरुवात ५८ मुक मोर्चे आणि अभूतपूर्व शिस्तीच्या कौतुकाने झाली होती, तेच आंदोलन पुढे आंतरवली सराटी येथील महिलांवरील लाठीमारानंतर आक्रमक आणि हिंसक वळणावर गेले. आमदारांची घरे पेटवणे, रस्ते रोखणे आणि गाड्या अडवणे यातून पेटलेला असंतोष हा केवळ आरक्षणाच्या मागणीपुरता राहिला नाही, तर तो प्रस्थापित राजकीय व्यवस्थेविरुद्धचा एल्गार बनला.

या संपूर्ण घडामोडींमध्ये सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनीही या आंदोलनाचा आपापल्या सोयीनुसार वापर करून घेतला. आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील यांनी सुरुवातीला अत्यंत निस्पृह, निष्पक्ष आणि सामान्य माणसाचा चेहरा म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. ग्रामीण बोलीचा आणि ‘माह्या-तुह्या’ सारख्या रांगड्या भाषेचा वापर करत त्यांनी सत्तेतील बड्या बड्या नेत्यांना थेट आव्हान दिले. पहाटेच्या शपथविधीपासून ते शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीपर्यंतचे अभूतपूर्व आणि अघटित राजकारण उघड्या डोळ्यांनी पाहणारा महाराष्ट्रातील तरुण वर्ग या आंदोलनाकडे एक आशेचा किरण म्हणून पाहू लागला. सुरुवातीच्या काळात भाजपच्या पोटात मराठा मतपेढीच्या ध्रुवीकरणाचे भय होते, तर सत्ताधारी शिवसेनेचे नेते आणि खुद्द एकनाथ शिंदे हे आंदोलन हाताळण्यात आघाडीवर होते. जरांगे यांचे उपोषण सोडवण्यासाठी मंत्र्यांची लागणारी पळापळ आणि जरांगे यांच्या मनात तत्कालीन मुख्यमंत्र्यांबद्दल दिसणारी सहानुभूती ही या राजकीय नाट्याचा एक भाग होती.

मात्र, राजकारणात रांगोळीचा एक ठिपका पुसला किंवा नव्याने मांडला की संपूर्ण आकार कसा बदलतो, याचा प्रत्यय हळूहळू येऊ लागला. आंदोलनाची हाताळणी शिवसेनेकडून भाजपकडे सरकली आणि पडद्यामागची चक्रे वेगाने फिरू लागली. आरक्षणाची मागणी, उपोषणे आणि आंदोलकांचा दबाव या सर्वांचा राजकीय गणितांवर प्रभाव पडत असतानाच, आंदोलनातील अंतर्गत त्रुटी आणि आक्षेपही समोर येऊ लागले. आंदोलनाच्या सुरुवातीला साधेपणाचा आव आणणारे नेतृत्व हळूहळू महागड्या गाड्या, हवाई प्रवास आणि राजकीय हालचालींचा भाग बनताना दिसले. जरांगे यांच्या निकटवर्तीयांवर ७६४ कोटींच्या कामांचे कंत्राट मिळवल्याचे आणि आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप झाले. वाळू उपशासारख्या कारवायांमध्ये सहकाऱ्यांची नावे पुढे येणे असो वा अगदी गावातील महिलांनी कार्यशैलीवर उपस्थित केलेले प्रश्न असो; निस्पृहतेच्या मुखवट्याला तडे जाण्यास सुरुवात झाली होती.

लोकसभा निवडणुकीत मराठा, मुस्लिम आणि दलित समीकरणाची जुळवाजुळव करण्याचा प्रयत्न झाला, तर दुसरीकडे ‘लाडकी बहीण’ योजनेसारख्या आर्थिक मदतीची एकगठ्ठा मतपेढी उभारून सत्ताधाऱ्यांनीही आपला राजकीय डाव साधला. निवडणुका जवळ येताच सर्वच राजकीय पक्षांनी आरक्षणाच्या मागणीला विरोध करण्याचे टाळले, पण राजकीय स्वार्थासाठी आंदोलनाचा वापर करण्याचे सत्र थांबले नाही. नेत्यांचा एकेरी उल्लेख, राजकीय विधाने आणि त्यानंतर फुटलेल्या संशयास्पद ध्वनीफिती यांनी या आंदोलनाला अधिकच गढूळ केले. भाजप समर्थकांच्या कुजबूज आघाडीतून आंदोलन चिरडण्याच्या आणि हाताळण्याच्या ज्या चर्चा पुढे आल्या, त्यांनी भाजपची कार्यशैली उघडी पाडली असली, तरी दुसरीकडे आंदोलनाची मूळ निष्ठा आणि प्रामाणिकपणा यावरही जनमानसात प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. निष्कर्षतः, महाराष्ट्रातील आरक्षण आंदोलन हे आता केवळ एका समाजाच्या हक्कांची लढाई राहिलेले नसून ते सत्तेच्या साठमारीचे आणि राजकीय समीकरणांचे केंद्रस्थान बनले आहे. तरुण पिढीच्या भावना, त्यांचा रोष आणि त्यांच्या भविष्याचा प्रश्न जेव्हा राजकीय हेतू साध्य करण्यासाठी वापरला जातो, तेव्हा मूळ हेतूलाच तडे जातात. आंदोलनाला सहानुभूतीची लाट नक्कीच मिळते, परंतु त्या सहानुभूतीच्या आडोशाने होणारे आर्थिक आणि राजकीय व्यवहार लोकशाहीच्या निकोप आरोग्यासाठी घातक आहेत. राजकारण्यांनी सत्ता टिकवण्यासाठी आणि आंदोलकांनी प्रसिद्धी किंवा वैयक्तिक हितसंबंधांसाठी समाजाचा वापर करण्याचे थांबवले पाहिजे. महाराष्ट्राला आज गरज आहे ती - भावनावश होऊन आक्रमक होणाऱ्या राजकारणाची नव्हे, तर सर्व घटकांना न्याय देणाऱ्या, पारदर्शक आणि प्रगल्भ धोरणात्मक निर्णयांची!

# मुक्ताईनगरमध्ये ‘यशवंत कॉलेज टॅलेंट सर्च एक्झामिनेशन २०२६’ चा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न!

मुक्ताईनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी संघ, मुक्ताईनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘यशवंत कॉलेज टॅलेंट सर्च एक्झामिनेशन २०२६’ चा भव्य पारितोषिक वितरण सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. संत मुक्ताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील संत ज्ञानेश्वर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एमपीएससी व यूपीएससी यांसारख्या स्पर्धा परीक्षांची प्राथमिक ओळख व्हावी, त्यांच्यात स्पर्धात्मक वृत्ती निर्माण व्हावी तसेच शासकीय सेवांकडे आकर्षित करण्याच्या उद्देशाने या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यस्तरीय स्वरूपाच्या या परीक्षेत मुक्ताईनगर व परिसरातील २६५ हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. त्यातून गुणवंत ठरलेल्या ४३ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आमदार चंद्रकांत निंबाजी पाटील होते. मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थी दशेतील विविध अनुभव सांगून स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून देशसेवा करण्याचे आवाहन केले. विद्यार्थी हे राष्ट्र उभारणीतील सर्वात महत्त्वाचे घटक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने झाली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. संघाचे अध्यक्ष अश्विन सुरवाडे यांनी प्रास्ताविकातून परीक्षेची संकल्पना व उद्दिष्टे स्पष्ट केली.

या परीक्षेत श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय, संत मुक्ताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, संत मुक्ताबाई कनिष्ठ महाविद्यालय, युवा भारत अकॅडमी, ए.सी.एस. कॉलेज तसेच फडके ज्युनियर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य डॉ. के. बी. पाटील, डॉ. रमेश शेवाळे उपस्थित होते. सानिका सोनार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यश शिरतुरे, सुमित सवर्ने, वैभव महाजन, हेमंत देवरे आणि सक्षम मोपार यांनी विशेष परिश्रम घेतले. राष्ट्रगीत व वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.

# रडत पोलीस ठाण्यात आलेल्या महिलेच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारा कर्तव्यदक्ष अधिकारी!

## मुलींच्या शोधापासून आई-लेकीच्या भेटीपर्यंत... मुक्ताईनगरचे पोलीस निरीक्षक आशिष अडसूळ यांच्या संवेदनशील कार्यपद्धतीला सलाम!



पोलीस ठाणे म्हटले की अनेकांच्या डोळ्यांसमोर कायदा, गुन्हे, तपास आणि कारवाई ही चित्रे उभी राहतात. मात्र, पोलिसांच्या वर्दीमागे एक माणूसही असतो, ज्याला समाजातील दुःख, वेदना आणि भावनांची जाणीव असते. विशेषतः एखादी आई आपल्या मुलीच्या काळजीने व्याकूळ होऊन पोलीस ठाण्याचा दरवाजा ठोठावते, तेव्हा तिच्यासाठी ते ठिकाण केवळ शासकीय कार्यालय राहत नाही, तर आशेचा किरण ठरते. अशा वेळी कायद्याची चौकट सांभाळत माणुसकीची ऊब देणाऱ्या अधिकाऱ्याची भूमिका महत्त्वाची ठरते. मुक्ताईनगरचे पोलीस निरीक्षक आशिष अडसूळ यांच्या संदर्भात महिला आणि मुलींच्या संवेदनशील प्रश्नांकडे पाहताना याच मानवी दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित होते असते.

**‘आईच्या डोळ्यांतील अश्रू समजून घेणे, हीदेखील कर्तव्याचीच बाजू!’**

एखाद्या मुलीने आपल्या पसंतीच्या व्यक्तीसोबत विवाह केला आणि त्यानंतर तिच्या आईला मुलीला भेटण्याची ओढ लागली, तर त्या आईच्या मनातील घालमेल शब्दांत मांडणे कठीण असते. मुलगी सुखरूप आहे ना? तिच्याशी बोलता येईल का? तिची भेट होईल का? अशा असंख्य प्रश्नांनी आईचे मन अस्वस्थ होते.

अशा प्रसंगी आईचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, मुलीची परिस्थिती समजून घेणे आणि कायदेशीर प्रक्रियेनुसार योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक असते. पोलीस निरीक्षक आशिष अडसूळ यांची संवेदनशील प्रकरणांतील भूमिका याच अपेक्षित दृष्टिकोनातून महत्त्वाची ठरते. आईच्या भावनांचा आदर राखतानाच मुलीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा आणि कायदेशीर अधिकारांचाही सन्मान राखणे, हा अशा प्रकरणांतील खरा समतोल आहे.

कारण प्रत्येक आईला आपल्या लेकीची काळजी असते आणि प्रत्येक मुलीलाही स्वतःच्या आयुष्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार असतो. या दोन्ही बाजू समजून घेत कायद्याच्या मार्गाने प्रश्न हाताळणे, हीच जबाबदार पोलिसिंगची खरी ओळख आहे.

**मुलींचा शोध आणि कुटुंबाच्या काळजाला मिळणारा दिलासा!**

मुलगी घरातून निघून गेल्यानंतर तिच्या आई-वडिलांची अवस्था अत्यंत अस्वस्थ करणारी असते. घरातील प्रत्येक कोपरा तिची आठवण करून देतो. फोनची प्रत्येक रिंग आशा निर्माण करते, तर प्रत्येक क्षण चिंता वाढवतो. अशा वेळी पोलिसांकडून होणारी तत्पर कार्यवाही कुटुंबासाठी मोठा आधार ठरते.




मुक्ताईनगर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात मुलींचा शोध घेण्याच्या प्रकरणांमध्ये पोलिसांची भूमिका महत्त्वाची असते. अशा तपासात पोलीस निरीक्षकांचे मार्गदर्शन, कर्मचाऱ्यांचा समन्वय आणि उपलब्ध माहितीच्या आधारे होणारी कार्यवाही यांना विशेष महत्त्व असते.

मुलगी सुरक्षितपणे सापडल्याची बातमी मिळाल्यानंतर आई-वडिलांच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान, त्यांच्या डोळ्यांतून वाहणारे आनंदाश्रू आणि मनावरील चिंतेचे हलके होणारे ओझे—यापेक्षा मोठा दिलासा कोणता? अशा क्षणी पोलिसांच्या कामाचे सामाजिक महत्त्व प्रकर्षाने जाणवते.

**कर्तव्यदक्षतेला संवेदनशीलतेची जोड!**

पोलीस अधिकारी म्हणून आशिष अडसूळ यांच्यासमोर कायदा-सुव्यवस्था राखण्यापासून गुन्ह्यांचा तपास करण्यापर्यंत अनेक जबाबदाऱ्या आहेत. मात्र, महिला आणि मुलींशी संबंधित प्रकरणांमध्ये संयम, संवाद आणि परिस्थितीची जाणीव या गुणांनाही तितकेच महत्त्व आहे.

*एखादी महिला अडचण घेऊन पोलीस ठाण्यात आली, तर तिचे म्हणणे ऐकून घेतले जाईल, तिला योग्य मार्गदर्शन मिळेल आणि तिच्या समस्येकडे गांभीर्याने पाहिले जाईल, असा विश्वास निर्माण होणे आवश्यक आहे.* अशा विश्वासातूनच पोलीस आणि नागरिक यांच्यातील नाते अधिक दृढ होते. मुलींच्या प्रकरणांमध्ये जातीन लक्ष देऊन पोलीस निरीक्षक आशिष अडसूळ हे आपले कर्तव्य पार पाडत असतात.

संवेदनशीलता म्हणजे कायद्यापासून दूर जाणे नव्हे, तर कायद्याचे पालन करताना माणसाच्या भावनांची जाणीव ठेवणे होय. महिला असो, मुलगी असो किंवा तिचे कुटुंबीय—प्रत्येकाशी सन्मानाने वागणे आणि प्रत्येक प्रकरणाची वस्तुस्थिती समजून घेणे ही पोलिसांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

**वर्दीतील माणुसकीच जनतेचा विश्वास जिंकते!**

पोलीस प्रशासनाचे खरे सामर्थ्य केवळ कारवाईत नसते; तर नागरिकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यातही असते. एखाद्या आईची चिंता कमी झाली, एखाद्या मुलीला योग्य मार्गदर्शन मिळाले आणि एखाद्या कुटुंबाला कठीण प्रसंगात आधार मिळाला, तर पोलिसांच्या सामाजिक जबाबदारीचे महत्त्व स्पष्ट होते.

मुक्ताईनगरचे पोलीस निरीक्षक आशिष अडसूळ यांच्यासारख्या अधिकाऱ्यांनी कर्तव्यदक्षतेसोबत संवेदनशीलता, निष्पक्षता आणि माणुसकीची जाणीव जपणे ही काळाची गरज आहे. कायद्याच्या चौकटीत राहून नागरिकांच्या समस्या समजून घेणारी कार्यपद्धती हीच लोकाभिमुख पोलीस व्यवस्थेची खरी ओळख ठरते.

शेवटी, पोलीस ठाण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला न्याय्य वागणूक मिळावी, प्रत्येक आईच्या काळजीची दखल घेतली जावी आणि प्रत्येक मुलीच्या अधिकारांचे संरक्षण व्हावे, हीच अपेक्षा.

वर्दी अंगावर असते; पण कर्तव्य मनात असते.
कायदा हातात असतो; पण माणुसकी हृदयात असली, तरच त्या वर्दीचा सन्मान अधिक वाढतो!

## महत्वाची बातमी

### लिस्टिंग होताच गुंतवणूकदार मालामाल




मुंबई : जिओ प्लॅटफॉर्म्सच्या आयपीओची बाजारात चर्चा सुरू असतानाच एका कंपनीने शेअर बाजारात दमदार पदार्पण केले आहे. या कंपनीने लिस्टिंगच्या पहिल्याच दिवशी गुंतवणूकदारांना प्रत्येक शेअरमागे ४६० रुपयांचा नफा मिळवून दिला आहे.

टोंबो इमेजिंग इंडिया (Tonbo Imaging India) या कंपनीने शेअर बाजारात जोरदार एंट्री केली असून, आपल्या आयपीओच्या किमतीपेक्षा ६६ टक्के अधिक परतावा दिला आहे. कंपनीचे शेअर्स २३ ऑक्टोबर रोजी शेअर बाजारात लिस्ट झाले. कंपनीच्या आयपीओची किंमत ७०० रुपये होती, तर शेअर्स १,१६० रुपयांवर लिस्ट झाले.

कंपनीने शेअर बाजाराला दिलेल्या माहितीनुसार, एनएसईवर Tonbo Imaging India चे शेअर्स १,१६० रुपयांवर लिस्ट झाले. ही किंमत आयपीओच्या इश्यू प्राइसपेक्षा ६५.७१ टक्के अधिक आहे. बीएसईवरही कंपनीचे शेअर्स १,१६२ रुपयांवर लिस्ट झाले. ही किंमत इश्यू प्राइसपेक्षा ६६ टक्के जास्त आहे. शेअर बाजारात पदार्पण करताच कंपनीचे बाजार भांडवल वाढून ६,६५६.१८ कोटी रुपयांवर पोहोचले. ग्रे मार्केटमधील अंदाजानुसारच कंपनीच्या आयपीओची लिस्टिंग झाली आहे.

### तांब्याला सोन्याचे दिवस! अचानक किमतीत तेजी



तांबे या धातूला बाजारात सोन्याचे दिवस आले आहेत. इलेक्ट्रिक वाहने, सोलार पॅनल, डेटा सेंटर, वीज वितरण व्यवस्था आणि औद्योगिक यंत्रसामग्रीमुळे तांब्याची मागणी दिवसेन् दिवस वाढू लागली आहे. त्यामुळे पूर्वी काच, कागद, पत्रा यांसाठी आग्रही असणारे भंगारव्यावसायिक आता जुनी विद्युत उपकरणे आणि त्यातील तांबे यांची सातत्याने विचारणा करत आहेत.

# कापूस खरेदीतील वजनकाटा घोटाळ्याने शेतकरी चिंतेत

शहादा (प्रतिनिधी ) - खानदेशातील सीमावर्ती भागात पांढऱ्या सोन्याचा अर्थात कापसाचा हंगाम सुरू झाला असून, शेजारील मध्य प्रदेशातील खेतिया बाजारपेठेसह नंदुरबार जिल्ह्यातील शहादा, तळोदा आणि परिसरात कापूस खरेदीला वेग आला आहे. मात्र, कापूस विक्रीदरम्यान वजनकाट्यांमध्ये फेरफार करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे वजनकाट्यांची नियमित तपासणी करून शेतकऱ्यांची होणारी लूट रोखावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

खानदेशातील सीमावर्ती भागातील अनेक शेतकरी आपला कापूस विक्रीसाठी खेतिया ( मध्य प्रदेश) आणि खेडदिगर ता. शहादा परिसरातील खासगी खरेदी केंद्रांवर घेऊन जातात. कापसाला मिळणारा भाव, वाहतुकीचा खर्च आणि बाजारपेठेतील उपलब्धता यांचा विचार करून शेतकरी कापूस विक्रीचा निर्णय घेतात. मात्र, कापूस खरेदी करताना वजनात तफावत आढळत असल्याच्या तक्रारींमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

नियमानुसार व्यापारी, जिनिंग कारखाने आणि कापूस खरेदी केंद्रांवरील इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांची वैधमापनशास्त्र विभागाकडून ठरावीक कालावधीनंतर तपासणी होणे आवश्यक आहे. वजनकाट्यांची अचूकता तपासून त्यावर अधिकृत मुद्रांकन आणि सील लावणे बंधनकारक असते. मात्र, काही ठिकाणी इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांमध्ये फेरफार करून प्रतिक्विंटल दोन ते पाच किलोपर्यंत वजन कमी दाखवले जात असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून केल्या जात आहेत.

कापसाचे वजन कमी दाखवले गेल्यास शेतकऱ्यांना विक्री केलेल्या मालाचा पूर्ण मोबदला मिळत नाही. एका शेतकऱ्याच्या कापसाच्या वजनात काही किलोची तफावत असली, तरी मोठ्या प्रमाणात कापूस खरेदी-विक्री करणाऱ्या केंद्रांवर अशा प्रकारामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे वजनकाट्यांची पारदर्शकता आणि अचूकता राखणे आवश्यक आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा, तळोदा आणि परिसरातील अनेक शेतकरी मध्य प्रदेशातील खेतिया व खेडदिगर परिसरातील कापूस खरेदी केंद्रांवर अवलंबून असतात. हा भाग आंतरराज्यीय सीमावर्ती असल्याने काही प्रकरणांमध्ये संबंधित यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव निर्माण होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत वजनकाट्यांतील तफावत आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींची प्रभावी दखल घेतली जात नसल्याची भावना व्यक्त होत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे आधीच शेतकरी अडचणीत आहेत. उत्पादन खर्चात वाढ, कापसाच्या बाजारभावातील चढ-उतार आणि शेतीमाल विक्रीसाठी करावा लागणारा खर्च यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. त्यातच कापूस विक्रीच्या वेळी वजनात तफावत आढळल्यास शेतकऱ्यांना दुहेरी आर्थिक फटका बसतो. त्यामुळे या प्रकाराला आळा घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

कापूस हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांची संभाव्य लूट रोखण्यासाठी महसूल विभाग आणि वैधमापनशास्त्र विभागाने संयुक्त भरारी पथके स्थापन करावीत, अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे. या पथकांमार्फत खेतिया, खेडदिगर तसेच सीमावर्ती भागातील खासगी कापूस खरेदी केंद्रांवरील वजनकाट्यांची अचानक तपासणी करावी. तपासणीदरम्यान वजनकाट्यांमध्ये फेरफार आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी. तसेच इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांचे प्रमाणपत्र, अधिकृत सील आणि मुद्रांकन वैध आहे की नाही, याची खातरजमा करावी. वजनात तफावत आढळल्यास शेतकऱ्यांच्या तक्रारींची तातडीने चौकशी करून त्यांना न्याय मिळवून द्यावा, अशीही मागणी होत आहे.

कापूस हे शेतकऱ्यांचे महत्त्वाचे नगदी पीक असून, संपूर्ण हंगामातील मेहनतीनंतर मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असतो. त्यामुळे कापूस खरेदी करताना वजनात कोणतीही तफावत राहू नये आणि शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा योग्य मोबदला मिळावा, यासाठी संबंधित यंत्रणांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. सीमावर्ती भागातील खासगी वजनकाट्यांची नियमित तपासणी, तक्रारींसाठी प्रभावी यंत्रणा आणि दोषींवर कठोर कारवाई केल्यास शेतकऱ्यांची होणारी संभाव्य आर्थिक लूट रोखता येऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आधुनिक भारताच्या निर्मितीचे खरे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर.. प्रा. डॉ. विलास चव्हाण..

भुसावळ : भालोद न्यू इंग्लिश स्कूलला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या ऐतिहासिक भेटीला ९७ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कला व विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी व राज्यशास्त्र विभागातर्फे ‘पाऊलखुणा प्रबोधन’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आंबेडकरी साहित्य, तत्त्वज्ञान आणि चळवळीचे अभ्यासक प्रा. डॉ. विलास चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. चव्हाण यांनी शिक्षण हे व्यक्ती व समाजाच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन असल्याचे सांगितले.




शिक्षणाशिवाय व्यक्तीची कौशल्ये, विचारक्षमता आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास अपूर्ण राहतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. संविधानाच्या माध्यमातून देशातील कोट्यवधी नागरिकांना शिक्षणाचा अधिकार मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे खरे शिल्पकार असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्राचार्य डॉ. के. जी. कोल्हे यांनीही मनोगतातून डॉ. आंबेडकरांचा खडतर शैक्षणिक प्रवास उलगडून सांगितला. कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी मानसिक ताकद आवश्यक असून विद्यार्थ्यांनी ज्ञानाची अखंड आस बाळगणाऱ्या डॉ. आंबेडकरांना प्रेरणास्थान मानावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास नारायण चौधरी, अरुण चौधरी, शरद परतणे, प्रा. डॉ. जतीन मेढे, प्रा. डॉ. सुनील नेवे यांच्यासह अनेक मान्यवर, माजी विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. विशेष बाब म्हणजे डॉ. आंबेडकरांनी भालोद न्यू इंग्लिश स्कूलला भेट दिल्यानंतर संस्थेविषयी नोंदवलेला अभिप्राय आजही संस्थेने अनमोल ठेवा म्हणून जतन करून ठेवला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. जतीन मेढे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. दिनेश पाटील यांनी केले.

# ज्ञानोदय सार्वजनिक वाचनालयात जिल्हा अधीक्षक कृषी विभाग कुर्बान तडवी यांची सदिच्छा भेट

मुक्ताईनगर : तालुक्यातील ज्ञानोदय सार्वजनिक वाचनालयास जिल्हा कृषी अधीक्षक कुर्बान तडवी यांनी भेट दिली. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष एस. ए. भोई यांनी शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला. भेटीदरम्यान दुष्काळी परिस्थिती, केळी पीक विमा, नुकसानभरपाई, शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत शासनामार्फत लवकरच उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहिती तडवी यांनी दिली. तसेच फळपीक विमा योजना प्रत्येक सीएससी सेंटरमार्फत भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी तालुका



कृषी अधिकारी अभिजीत शिंदे, कृषी अधिकारी किरण महाजन, सहायक कृषी अधिकारी संदीप पाटील, उपाध्यक्ष शरद महाजन, भाऊराव महाजन, प्रभाकर महाजन, भानुदास टेलर, उखर्डू बोरसे, नितीन पाटील, अनिल वाडीले, बी. डी. बारी, मोहन बेलदार , शेतकरी, वाचक, ग्रंथपाल, कर्मचारी तसेच सीएससी सेंटरचे संचालक उपस्थित होते.




# रोटरी क्लब पाचोरा भडगाव तर्फे जागतिक पोलिओ दिन साजरा

पाचोरा-- येथील रोटरी क्लब पाचोरा भडगाव तर्फे दिनांक 24 ऑक्टोंबर, जागतिक पोलिओ दिनानिमित्त विशेष जनजागृती उपक्रम साजरा करण्यात आला. पाचोरा शहरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक (मिठाबाई) कन्या विद्यालयात या निमित्ताने विद्यार्थिनींना जनजागृती पर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी कन्या विद्यालयाचे प्राचार्य तथा रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. शिवाजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, प्रकल्प सेक्रेटरी डॉ प्रशांत सांगडे, डिस्ट्रिक्ट ऑफिसर डॉ.मुकेश तेली, असिस्टंट गव्हर्नर भरत सिनकर, ज्येष्ठ सदस्य चंद्रकांत शेठ लोढाया, चंद्रकांत कोतकर, जयदीप पाटील, नंदू पाटील, मंचावर उपस्थित होते.

यावेळी डॉ प्रशांत सांगडे व बालरोग तज्ञ डॉ मुकेश तेली यांनी आपल्या ओघवत्या शैलीत जगातील पोलिओ उच्चाटन मोहिमेत आंतरराष्ट्रीय रोटरी च्या योगदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. चंद्रकांत कोतकर यांनी रोटरी क्लब पाचोरा भडगाव च्या उपक्रमांची उजळणी करून दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिल पवार , उमेश कडलग, प्रा.प्रतिभा पाटील, प्रा. संगीता राजपूत, संगीता बाविस्कर, सुरेखा बडे, शिवराम पाटील, धनराज धनगर, शकील खाटीक आदींनी परिश्रम घेतले.

# वाढत्या लोकसंख्येमुळे शहाद्यात स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाण्याची जोरदार आर पी आयची मागणी

शहादा ( प्रतिनिधी ) - शहादा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून, भौगोलिक क्षेत्राचाही विस्तार होत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पोलीस यंत्रणेवर कामाचा मोठा ताण पडत असल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शहादा येथे स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाणे सुरू करावे आणि नवीन पोलीस वसाहत उभारावी, या प्रमुख मागण्यांसाठी पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

या मागण्यांसंदर्भात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनही सादर केले. पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नंदुरबार जिल्हाध्यक्ष विक्की मोरे यांच्या नेतृत्वाखाली या मागण्यांसाठी पुढाकार घेण्यात आला. शहादा तालुक्यातील वाढती लोकसंख्या, विस्तारणारा भौगोलिक परिसर आणि ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न लक्षात घेता स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाण्याची स्थापना करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शहादा शहर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात शहरासह जवळपास २३ ग्रामीण गावांचा समावेश असल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे शहर आणि ग्रामीण भागातील कायदा व



सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी एकाच पोलीस ठाण्यावर येत आहे. परिणामी, पोलीस कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण वाढत असून, उपलब्ध मनुष्यबळ आणि सुविधांच्या मर्यादेमुळे नागरिकांना वेळेवर पोलीस मदत मिळण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील वाढत्या लोकसंख्येचा आणि विस्तारणाऱ्या क्षेत्राचा विचार करता स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाणे सुरू करणे गरजेचे असल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. स्वतंत्र पोलीस ठाण्यामुळे ग्रामीण भागातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे, तक्रारींची दखल घेणे आणि नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून देणे अधिक सुलभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

शहादा तालुक्यातील काही गावे गुजरात आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या सीमेलगत आहेत. त्यामुळे सीमावर्ती भागातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पोलिसांसमोर आहे. चोरी, घरफोडी, मारामारी, कौटुंबिक वाद, भांडणे आणि इतर गुन्हेगारी घटनांमुळे पोलीस यंत्रणेवरील जबाबदारी वाढत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या भागात प्रभावी पोलीस यंत्रणा उपलब्ध असणे आवश्यक असून, स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाण्याच्या माध्यमातून गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होऊ शकते. तसेच ग्रामीण भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस यंत्रणेचे बळकटीकरण करणे गरजेचे असल्याची भूमिका पक्षाच्या वतीने मांडण्यात आली.

स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाण्याबरोबरच शहादा येथे नवीन पोलीस वसाहत उभारण्याची मागणीही करण्यात आली आहे. पोलीस कर्मचाऱ्यांना आवश्यक निवासव्यवस्था उपलब्ध झाल्यास त्यांच्या कामकाजात सुलभता निर्माण होईल. त्यामुळे पोलीस वसाहतीचा प्रश्नही प्राधान्याने सोडवावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. वाढती लोकसंख्या, ग्रामीण भागाचा विस्तार आणि सीमावर्ती क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेऊन शासन व पोलीस प्रशासनाने या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा. स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाणे सुरू करून नवीन पोलीस वसाहत उभारण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

epaper.muktaidoot.com

मुक्ताई दूत

## Short News

### जळगाव जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले ; तारखा जाहीर, 'हे' दहा मातब्बर रिंगणाबाहेर, वारसदारांची एण्ट्री



जळगाव : जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून २९ नोव्हेंबर रोजी मतदान, तर ३० नोव्हेंबरला मतमोजणी व निकाल जाहीर होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून धुळे जिल्हा उपनिबंधक मनोज चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली असून २६ ऑक्टोबरपासून आचारसंहिता लागू होणार आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार २६ ते ३० ऑक्टोबरदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल केले जातील. २ नोव्हेंबरला छाननी, ३ नोव्हेंबरला उमेदवारांची यादी प्रसिद्ध होईल. अर्ज माघारी घेण्याची मुदत १७ नोव्हेंबरपर्यंत असून १८ नोव्हेंबरला अंतिम यादी व चिन्हवाटप होणार आहे.

बँकेच्या निवडणुकीसाठी २,५७१ मतदार पात्र आहेत. सध्या बँकेच्या २३७ शाखा आणि १२ लाखांहून अधिक ग्राहक आहेत. महायुतीकडून निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न सुरू असले तरी महाविकास आघाडी स्वतंत्र पॅनल उभे करण्याच्या तयारीत असल्याने निवडणूक दुरंगी होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सलग दहा वर्षे संचालक राहिलेल्यांना निवडणूक लढवता येणार नसल्याने अनेक दिग्गज नेते रिंगणाबाहेर राहणार आहेत. यात विद्यमान चेअरमन संजय पवार, माजी मंत्री अनिल पाटील, आमदार किशोर पाटील, माजी आमदार चिमणराव पाटील, आमदार अमोल पाटील, माजी मंत्री गुलाबराव देवकर, ॲड. रवींद्र पाटील, मंत्री संजय सावकारे, माजी मंत्री एकनाथ खडसे आणि ॲड. रोहिणी खडसे यांचा समावेश आहे. त्यामुळे यंदा अनेक दिग्गजांच्या वारसदारांना संधी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# आईच्या शब्दासाठी धावत पूर्ण करतोय बारा ज्योतिर्लिंगांचा संकल्प,मातृभक्ताचे मुक्ताईनगरीत स्वागत

मुक्ताईनगर : आजच्या आधुनिक युगात अनेक ठिकाणी आई-वडिलांच्या सेवेकडे दुर्लक्ष होत असल्याची उदाहरणे पाहायला मिळतात. मात्र बिहारमधील १९ वर्षीय मोनू मेटूरबाला यांनी आपल्या कृतीतून मातृभक्तीचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. आपल्या आजारी आईच्या आरोग्यासाठी त्यांनी बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेण्याचा संकल्प केला असून तो पूर्ण करण्यासाठी ते हजारो किलोमीटर अंतर धावत पार करत आहेत.

१५ मार्च २०२६ रोजी सुरू झालेल्या या आध्यात्मिक प्रवासात मोनू यांनी आतापर्यंत सुमारे ८ हजार किलोमीटरचे अंतर धावत पूर्ण केले आहे. आईच्या शब्दाला प्रमाण मानून आणि भगवान महादेवावरील अढळ श्रद्धा मनात ठेवून त्यांनी हा कठीण प्रवास सुरू केला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांची जिद्द, चिकाटी



आणि मातृप्रेम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

मोनू मेटूरबाला यांचे मुक्ताईनगर येथे आगमन झाल्यानंतर नागरिकांनी त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत केले. यावेळी आमदार चंद्रकांत पाटील यांनी त्यांचा सत्कार करून पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. शिवसेना, युवासेना पदाधिकारी, शिवसैनिक, महाकाल भक्त व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आईच्या आरोग्यासाठी देवाला घातलेले साकडे आणि त्या संकल्पपूर्तीसाठी सुरू असलेला त्यांचा संघर्ष आजच्या तरुण पिढीसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण करत आहे. आई-वडिलांचा सन्मान, त्यांच्यावरील प्रेम आणि सेवाभाव हीच खरी संस्कृती असल्याचा संदेश मोनू यांच्या कृतीतून मिळतो. कलियुगातही मातृसेवेसाठी आयुष्य झोकून देणारा हा तरुण अनेकांसाठी प्रेरणेचा दीप ठरत असून श्री संत आदिशक्ती मुक्ताई मातेच्या पावन भूमीत झालेल्या त्यांच्या स्वागताने उपस्थितांच्या भावना दाटून आल्या.

## मराठी पत्रकार विकास असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची निवड

विशेष प्रतिनिधी : सामाजिक विकास आणि पत्रकारांच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या मराठी पत्रकार विकास असोसिएशनची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. संघटनेच्या अध्यक्षपदी निर्भीड पत्रकार राहुल महाजन यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी प्रवीण बोरसे, कार्याध्यक्ष तथा सचिवपदी नंदकुमार शेलकर, सहसचिवपदी चिंतामण पाटील तर प्रसिद्धी प्रमुखपदी अन्वर शेख यांची निवड झाली.

शासन नोंदणीकृत असलेली ही संघटना पत्रकार, छायाचित्रकार, वार्ताहर, संपादक, श्रमिक पत्रकार तसेच वृत्तपत्र वितरकांच्या हक्कांसाठी कार्य करणार आहे. पत्रकारांच्या सुरक्षेचे प्रश्न, हक्कांचे संरक्षण आणि सामाजिक विकासाला चालना देणे हा संघटनेचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले. निष्पक्ष पत्रकारितेला बळ देत पत्रकारांचा सन्मान व अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी संघटना कटिबद्ध राहील, असे अध्यक्ष राहुल महाजन यांनी सांगितले. तसेच राज्यभर सदस्य नोंदणी अभियानही लवकरच राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## महिला जनजागृती व कायदेविषयक कार्यशाळा उत्साहात



शहादा : युवकमित्र परिवार संस्था कोठली संचलित महिला समुपदेशन केंद्रामार्फत महिला दक्षता समिती, सामाजिक कार्यकर्त्या व महिलांसाठी जनजागृती आणि कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जुन्या पोलीस स्टेशन आवारातील महिला समुपदेशन केंद्रात झालेल्या कार्यक्रमात उपनगराध्यक्षा माधवी पाटील उद्घाटक म्हणून उपस्थित होत्या, तर महिला पोलीस उपनिरीक्षक गीतांजली दुड्डे अध्यक्षस्थानी होत्या.

यावेळी संकटग्रस्त महिलांसाठी समुपदेशन केंद्र महत्त्वाचा आधार असून महिलांनी कोणतीही भीती न बाळगता केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, हुंडाबंदी कायदा तसेच केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या मोफत सेवांची माहिती देण्यात आली. समुपदेशन केंद्र हे महिलांना मानसिक व सामाजिक आधार देणारे असून कुटुंब टिकविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगण्यात आले. प्रास्ताविक आरती पाटील यांनी केले, तर आभार कविता माळी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्चना पावरा यांचे सहकार्य लाभले.

## दुर्गा विसर्जनानंतर नगरसेवकावर हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा

यावल : शहरातील दुर्गा विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडल्यानंतर प्रभाग क्रमांक ८ चे नगरसेवक सागरकुमार सुनील चौधरी यांच्यावर चौघांनी हल्ला केल्याची घटना घडली. चावडी चौकाजवळ सागर कांबळे यांच्या घरासमोर रात्री सव्वाअकरा वाजेच्या सुमारास हा प्रकार घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

फिर्यादीनुसार, विसर्जन व्यवस्थेची जबाबदारी पार पाडल्यानंतर सागर चौधरी घरी जात असताना विलास रमेश चौधरी, गोपाल नारायण चौधरी, अक्षय गोपाल चौधरी आणि दिनेश गोपाल चौधरी यांनी त्यांचा रस्ता अडवला. त्यानंतर शिवीगाळ करून चौघांनी मिळून मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या वेळी दिनेश चौधरी याने लाकडी फळीने कानावर मारल्याचे, तर अक्षय चौधरी याने धारदार वस्तूने पोटाजवळ वार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या हल्ल्यात सागर चौधरी यांच्या डाव्या कानाला व पोटाच्या डाव्या बाजूस दुखापत झाली. रस्त्याने जाणारे नरेंद्र माळी व राहुल चौधरी यांनी त्यांना यावल पोलीस ठाण्यात नेले. त्यानंतर प्राथमिक उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून पुढील उपचारासाठी जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविण्यात आले.

या प्रकरणी चौघांविरुद्ध यावल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल सुनील पाटील करीत आहेत.

## नाशिकमध्ये FDA ची मोठी कारवाई !

### 2,230 किलो मसाले जप्त; किंमत तब्बल 11.86 लाख रुपये

नाशिक : सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) नाशिकमध्ये मोठी कारवाई करत द्वारका परिसरातील 'सोमेश्वर घरगुती मसाले' या आस्थापनेतून २ हजार २३० किलो मसाल्यांचा साठा जप्त केला. जप्त मालाची एकूण किंमत ११ लाख ८६ हजार २०० रुपये असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

सण-उत्सव विशेष मोहीम २०२६ अंतर्गत करण्यात आलेल्या तपासणीत मसाल्यांच्या पॅकिंगवर लेबलिंगविषयक नियमांचे उल्लंघन आढळून आले. तसेच काही उत्पादनांच्या गुणवत्तेबाबतही संशय व्यक्त करण्यात आल्याने साठा ताब्यात घेण्यात आला.

या कारवाईत हळद पावडर, मिरची पावडर, धणे पावडर, कांदा-लसूण मसाला, सुपर मिक्स गरम मसाला आणि काळा मसाला यांचा समावेश आहे. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

सणासुदीच्या काळात ग्राहकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत यासाठी विशेष तपासणी मोहीम सुरू असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# पाळधी उड्डाणपुलावरील दुरुस्तीवेळी क्रेन कोसळून चालकाचा मृत्यू

## पाळधी उड्डाणपुलाच्या दुरुस्तीवेळी क्रेन कोसळली; कामाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

जळगाव : पाळधी ते तरसोद बायपास महामार्गावरील पाळधी येथील रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना शुक्रवारी भीषण अपघात घडला. उड्डाणपुलावरील साईड गर्डरचा मोठा तुकडा क्रेनच्या सहाय्याने उचलण्याचे काम सुरू असताना सुमारे १०० फूट उंचीवर असलेली क्रेन अचानक खाली कोसळली. या दुर्घटनेत क्रेन चालक मधुकर धनराज पाटील (वय ४४, रा. वंजारी खपाट, ता. धरणगाव) यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे महामार्ग परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पाळधी गावाजवळील रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरुस्तीचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. पुलाच्या बाजूचा गर्डर उचलण्याची प्रक्रिया सुरू असताना अचानक क्रेनचा तोल गेला आणि ती थेट खाली कोसळली. अपघात इतका भीषण होता की क्रेनचे मोठे नुकसान झाले. तसेच उड्डाणपुलाच्या संरक्षण भिंतीचाही काही भाग कोसळून नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे.



या दुर्घटनेनंतर महामार्गावरील कामाच्या दर्जाबाबत आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. विशेष म्हणजे पाळधी ते तरसोद बायपास मार्गावरील रेल्वे उड्डाणपुलांच्या कामाबाबत यापूर्वीही अनेकदा तक्रारी आणि शंका व्यक्त करण्यात आल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी तरसोद येथील रेल्वे उड्डाणपुलाचा भराव खचल्याने संबंधित भागातील दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले होते. त्यानंतर गेल्या तीन महिन्यांपासून या मार्गावर एकेरी वाहतूक सुरू असून वाहनचालकांना वाहतूक कोंडी, वेळेचा विलंब आणि अपघातांचा धोका सहन करावा लागत आहे.

महामार्गावरील दुरुस्तीचे काम संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या कालावधीत या मार्गावर अनेक अपघात घडले असून काही जणांना जीवही गमवावा लागला आहे. त्यामुळे कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन होते का, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, क्रेन कोसळण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून तांत्रिक बिघाड, यंत्रसामग्रीतील दोष किंवा अन्य कारणांची तपासणी केली जात आहे. अपघातात मृत्यू झालेल्या चालकाच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. सायंकाळी उशिरापर्यंत या प्रकरणाची पोलिसांत अधिकृत नोंद झालेली नव्हती.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक व मालक - संतोष सुपडू मराठे (मोबा.- 9850251555) व यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -33, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -425001 येथे छापून 270,भोईवाडा, शिवसेना कार्यालय जवळ, शिवरायनगर,दुसरा मजला, मुक्ताईनगर ता.मुक्ताईनगर जि.जळगाव , 425306 (महाराष्ट्र ), येथे प्रसिद्ध केले. मुख्यसंपादक - संतोष सुपडू मराठे (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) तसेच संपादक तथा वितरण व्यवस्थापक अमोल सतीश वैद्य (RNI-MHMAR/26/A1057) कार्यालय दूरध्वनी क्र. : 02583-299436, E-Mail : muktaidoot@gmail.com वेबसाईट : www.muktaidoot.com